VIDYA VIKAS SHIKSHAN SANSTHA, HINGANGHAT

**VIDYA VIKAS ART'S, COMMERCE & SCIENCE COLLEGE, SAMUDRAPUR DIST. WARDHA 442305 (M.S.)**

(Affiliated to RashtrasantTukdoji Maharaj Nagpur University, Nagpur.)

Dr. K. G. Rewatkar
Principal
( NAAC Accreted B 2015 )

email: vidya_vikascoll@rediffmail.com website : www.vidyavikascollege.com

Ph. & Fax No. 07151 225560, 295440, 9822426769 ( Estd. 1989 )

| |
|---|
| **Name of activity: Medicinal Plant Exhibition**, Staff and local people of Samudrapur. |
| **Name of Programme Organizer (Co-Ordinator): Dr. N. S. Shirbhate** |
| **Details of organization with Address:** Department of Science, Vidya Vikas Arts, Commerce and Science College, Samudrapur; Waghadi Foundation, Samudrapur, and Mahatma Gandhi Ayureved Hospital Wardha. |
| **Date of Conduction :** 07/04/2022 ( International Health Day) |
| **Participant Count:** Students: - 47<br>Faculty:- 15<br>People: - 52 |
| **Brief Description:**<br>Department of Botany, Vidya Vikas Arts, Commerce and Science College, Samudrapur. Waghadi Foundation, Samudrapur, and Mahatma Gandhi Ayureved Hospital Wardha. Efforts was taken by Dr. S. Yeotkar, V. Manwatkar, Mr. Rahul Pawar and Ms. D. Mende. Dr. Rajkumar Gupta guided and explain about the 60 medicinal plants. He has conserve many species of plants in their garden which are medicinally useful. |
| **Outcomes of the activity:**<br>1. People, Students and staff get benefited.<br>2. All get knowledge about advantages of plants in medicinal point of view.<br>3. Students become aware about the preservation of medicinal plant species.<br>4. We planted some species in our Botanical garden. |
| **Photos:** |






Datta Meghe Institute of Medical Sciences
[Deemed to be University]
Conferred 'A' Grade status by H.R.D. Ministry Govt. Of India
Re-accredited by NAAC (3rd Cycle) with 'A+' Grade

# Mahatma Gandhi Ayurved College, Hospital & Research Centre,

Salod (Hirapur),-442017, Wardha (M.S.), India
College -07152-304532, 304545, **Dean Chamber** -07152- 304567, **Hospital**:- 07152-304560
**Email ID**:- mgayurvedcollege@gmail.com, **College Website** :- www.mgachrc.org,
University Website -www.dmimsu.edu.in

Ref. No./MGACHRC/2021-22/

Date: 04/04/2022

TO,

Dr.Nayana Shirbhate,
Vice Principal,
Vidya Vikas Arts Commerce and Science College,
Samudrapur, Dist.Wardha.

**Subject**: An Invitation for **Multidiagnostic** Mega Health Camp & **Medicinal Plant Exhibition** at Vidya Vikas Arts, Commerce, and Science College, Samudrapur, Dist. Wardha.

Respected Sir,

With the reference of above subject we are organizing **Multidiagnostic** Mega Health Camp & **Medicinal Plant Exhibition**, Samudrapur, and Dist: Wardha, on 7th April 2022 on the occasion of World Health day, it's our pleasure to invite you in Mega Health Camp. Kindly accept our invitation.

Thank you

Date: 04/04/2022
Place: Wardha.

DEAN
Mahatma Gandhi Ayurved
College Hospital and Research
Centre, Salod (H), Wardha.

PRINCIPAL
M. G. A. C. H. & R. Centre
SALOD (H), WARDHA.

Organizing Chairman
Dr.Preeti Borkar,
Prof. & Head
Dept. of Samhita, Multidiagnostic,
Megacamp, Samrudrapur, Wardha

# समूद्रपूर येथे आयुर्वेदीक वनस्पती प्रदर्शनी व आयुर्वेदोपचार शिबीर संपन्न

दत्ता मेघे आयुर्विज्ञान अभिमत विद्यापीठ संचालित सालोड (हिरापूर) येथील महात्मा गांधी आयुर्वेद रूग्णालय तथा वाघाडी फॉउडेशन,समुद्रपूर, विद्याविकास कला वाणिज्य महाविद्यालय,समूद्रपूर यांच्या संयुक्त विद्यमाने गुरूवार, दि.७ एप्रिल रोजी समुद्रपूर येथील विद्याविकास कला वाणिज्य महाविद्यालयात सर्वरोग निदान व आयुर्वेदिक उपचार शिबीर व मॅमोग्राफीव्दारे स्तनकर्करोग तपासणी संपन्न झाले आहे. तसेच आयुर्वेदाचा प्रचार व प्रसार जनमानसात व विद्यार्थ्यात व्हावा यासाठी आयुर्वेदिक वनस्पतींची प्रदर्शनीही शिबिरस्थळी लावण्यात आली होती. भारत सरकारच्या भारतीय चिकित्सा पध्दती राष्ट्रीय आयोग तथा आयुष मंत्रालयाच्या मार्गदर्शक तत्वानुसार स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्य विश्व स्वास्थ दिनाच्या औचित्याने या शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाची सुरूवात तृतीय वर्ष आयुर्वेदाचार्य विद्यार्थी हरविंदरसिंग बावरी यांच्या धन्वंतरी स्तवनाने झाली. या शिबीराचे उद्घाटन प्रमुख पाहुण्या समुद्रपूर नगराध्यक्षा व सभापती सौ. योगिताताई तुळणकर यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष विद्या विकास महाविद्यालयाचे सचिव डॉ. श्री. उमेश तुळसकर सर होते. याप्रसंगी विद्या विकास महाविद्यालयाच्या उपप्राचार्या सौ. नयना शिरभाते मॅडम, माजी सभापती समुद्रपूर डॉ. रामकृष्ण खुजे सर यांनी मार्गदर्शनवर भाषण केले. याप्रसंगी वाघाडी फाऊंडेशनचे अध्यक्ष व पाणीपुरवठा सभापती श्री. ललित डगवार सर, जेष्ठ पत्रकार श्री. शांतीलाल गांधी सर, श्री. निर्मल भोयर, उपसभापती श्री. बाबाराव थोटे सर, विद्याविकास महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ. मेघश्याम ठाकरे सर उपस्थित होते.

या शिबिरात सांधेदुखी, कमरेचे व मानेचे आजार, लकवा, उच्च रक्तदाब, मधुमेह, कर्णबधिरता, डोळयाचे विविध विकार, जुनाट त्वचारोग, शरीरावरील गाठी, विविध स्त्रीरोग, स्तनरोग, स्तनकर्करोग तपासणी,मासिक पाळीविषयक तक्रारी, लहान मुलांचे आजार, अम्लपित्त, जुनाट सर्दी, अर्धशिशी, डोके दुखणे याबाबतच्या तपासण्या आणि उपचार या शिबीरात करण्यात आल्या. या शिबीरातून महात्मा गांधी आयुर्वेद रूग्णालयात भरती होणाऱ्या रूग्णांना नोंदणी शुल्क, बेड शुल्क लागणार नसून डॉक्टरांच्या सल्यानुसार सामान्य चाचण्या व तपासण्या मोफत उपलब्ध करून देण्यात आल्या. आयुर्वेद रूग्णालयातील बाहयरूग्ण व आंतररूग्ण विभागात विविध आजारांकरिता पंचकर्म सुविधांमध्येही नागरिकांना सवलत प्राप्त देण्यात आली. तसेच, मूळव्याध, भगंदर, फिशर या रोगांची तपासणी करून नाममात्र सेवाशुल्कात शस्त्रक्रियासुध्दा या शिबीरामार्फत करण्यात येणार आहे. नागरिकांनी आपल्या कुटुंबाच्या निरामय आरोग्यासाठी या आयुर्वेदिक उपचार शिबिराचा तसेच आयुर्वेदिक वनस्पती प्रदर्शनीचा लाभ घेतला वनस्पती दर्शनाचे आयोजन डॉ. राजकुमार गुप्ता यांनी केले. दत्ता मेघे आयुर्विज्ञान अभिमत विद्यापीठ संस्थेचे विशेष कार्यकारी अधिकारी माननीय डॉ. अभ्युदय मेघे, अधिष्ठाता व मुख्य वैद्यकीय अधीक्षक डॉ. वैशाली कुचेवार, समन्वयक व्ही. आर. मेघे, शिबीर प्रमुख डॉ. विनोद आडे, डॉ. प्रेमकुमार बडवाईक यांच्या मार्गदर्शनाने शिबीर यशस्वीरित्या संपन्न झाले. शिबीर समन्वयक म्हणुन डॉ. भूषण म्हैसकर यांनी परिश्रम घेतले, तसेच संस्कृत संहिता सिध्दान्त विभाग प्रमुख डॉ. प्रिती बोरकर मॅडम यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. कॅम्प प्रमुख डॉ. आडे सर यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संचलन डॉ. ज्ञानेश जोशी यांनी केले. या प्रसंगी डॉ. शितल आसूटकर (शल्यतंत्र), डॉ. गौरव धोत्रे (शालाक्यतंत्र), डॉ. मयुरी देशपांडे (कायचिकित्सा), डॉ. तृप्ती ठाकरे (बालरोग), डॉ. चित्रवीणा निब्रड (पंचकर्म), पदव्युत्तर विद्यार्थी डॉ. प्रत्येंद्र, डॉ. उत्कर्षा, डॉ. सोनू, डॉ. प्रवीण, डॉ. मोनिका, डॉ. रूची, तृतीय वर्ष विद्यार्थीनी सोनम मेंढे, परिचारिका पार्वती एसनकर, इन्टर्न विद्यार्थी लक्ष्मीकांत, वैष्णवी, आफरीन अली, अमित, निकिता, पायल यांनी सेवाभावी योगदान केले. या शिबीराचे समन्वयक डॉ. भूषण म्हैसकर सर होते. डॉ. प्रेमकुमार बडवाईक सर यांनी आभार प्रदर्शन केले.

नवराष्ट्र

## समुद्रपूर येथे उद्या शिबिर

# आयुर्वेदिक वनस्पती प्रदर्शनीचे आयोजन

वर्धा, ब्युरो. दत्ता मेघे आयुर्विज्ञान अभिमत विद्यापीठ संचालित सालोड (हिरापूर) येथील महात्मा गांधी आयुर्वेद रुग्णालय, वाघाडी फाउंडेशन आणि विद्याविकास कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक आरोग्य दिनानिमित्त गुरुवार 7 एप्रिल रोजी समुद्रपूर येथे सर्वरोग निदान व आयुर्वेदिक उपचार महाशिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. आयुर्वेदाचा प्रचार व प्रसार व्हावा, यासाठी आयुर्वेदिक वनस्पतींची प्रदर्शनीही शिबिरस्थळी लावण्यात येणार आहे.

भारत सरकारच्या भारतीय चिकित्सा पध्दती राष्ट्रीय आयोग व आयुष मंत्रालयाच्या मार्गदर्शक तत्वानुसार स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त समुद्रपूर येथील विद्याविकास महाविद्यालयात आयोजित या शिबिराचे उद्घाटन सकाळी 10 वाजता होईल. शिबिरात सांधेदुखी, कंबरेचे व मानेचे दुखणे, हाडांचा ठिसूळपणा, लकवा, विविध वातरोग, उच्च रक्तदाब, मधुमेह, कर्णबधिरता, डोळ्यांचे विविध विकार, जुनाट त्वचारोग, शरीरावरील गाठी, स्त्रीरोग, मासिक पाळीविषयक आजार, अशक्तपणा, लहान मुलांचे आजार, गतिमंदता, तोतडेपणा, पोटाचे आजार, दमा, आम्लपित्त, नाक कान व घसा रोग, जुनाट सर्दी, अर्धशिशी, डोकेदुखी, मानसिक ताणतणाव याबाबत तपासणी, रोगनिदान व आयुर्वेद उपचार करण्यात येतील.

या शिबिरातून महात्मा गांधी आयुर्वेद रुग्णालयात भरती होणाऱ्या रुग्णांना नोंदणी शुल्क, रुग्णखाट शुल्क लागणार नसून, वैद्यकीय सल्ल्यानुसार सामान्य तपासण्या व चाचण्याही मोफत करण्यात येतील. पंचकर्म सुविधांमध्ये शिबिरातील भरती रुग्णांना सवलत प्राप्त होणार आहे.

तर मूळव्याध, भगंदर, फिशर, हर्निया, हायड्रोसिल या व्याधींवरील शस्त्रक्रिया या शिबिरामार्फत नाममात्र सेवाशुल्कात करण्यात येणार आहेत.

परिसरातील नागरिकांनी आपल्या कुटुंबाच्या निरामय आरोग्यासाठी या आयुर्वेदिक उपचार शिबिराचा तसेच आयुर्वेदिक वनस्पती प्रदर्शनीचा लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थेचे विशेष कार्य अधिकारी डॉ. अभ्युदय मेघे, अधिष्ठाता व मुख्य वैद्यकीय अधीक्षक डॉ. वैशाली कुचेवार, शिबीर प्रमुख डॉ. विनोद आडे, डॉ. प्रेमकुमार बडवाईक, शिबीर समन्वयक डॉ. भूषण म्हैसकर, डॉ. प्रीती बोरकर, विद्याविकास शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. उमेश तुळसकर, प्राचार्य डॉ. किशोर रेवतकर, वाघाडी फाउंडेशनचे अध्यक्ष ललित डगवार यांनी केले आहे.

Wardha Plus Edition
06 April 2022 Page No. 4
epaper.navarashtra.com

Prof. N. H. Shiobhate
Head, Dept of Botany
Vidya Vikas Arts, Commerce
& Science College Samudrapur
Dist. Wardha 44

Principal
Vidya Vikas Arts Comm. &
Science College, Samudrapur